# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/10/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक १२/१०/२०२३ रोजी ४.३० वा. दरम्यान पो.स्टे खापा हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असतांना विश्वसनिय गुप्त बातमीदार मार्फत प्राप्त माहितीनुसार सिरोंजी ते बडेगाव रोडवर एक इसम आपल्या मोटरसायकलने अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करून नेत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून सिरोंजी ते बडेगाव रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाकाबंदी केली असता एक इसम आपले एस स्प्लेंडर गाडीने अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करतांना मिळून आल्याने चालकाला थांबवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव बंडू भलावी रा. सिरोंजी ता. सावनेर असे सांगितले. आरोपीचे ताब्यातून १) मोहफुल गावठी दारू ६० लिटर एकूण ६०००/— रु. २) स्प्लेंडर गाडी क्र. MH 40 BU 2922 किंमती ५०,०००/— रू. असा एकूण ५६०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर जप्त मुद्देमाल व आरोपी मोटरसायकल चालक यांचे विरुद्ध पो. स्टे. खापा येथे ६५ (इ) (अ) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे खापा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, किशोर वानखेडे यांनी पार पाडली.

## नवजात अर्भकाला बेवारस सोडून देणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १३ किमी अंतरावरील वार्ड क्र. १०४ पाटणसांवगी सावनेर येथे दिनांक ११/०६/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे — श्रीमती पार्वती सुर्यभान तरारे, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ गजानन नगर लेआउट पाटणसावंगी ता. सावनेर हि दि. ११/१०/२०२३ चे सकाळी ०६.०० वा. दरम्यान ती आपले घरा जवळील बायपास रोड जवळ पायदळ चालण्यास गेली असता तिला तिचे घरापासुन काही अंतरावर असलेल्या महेन्द्र गणपत धार्मिक रा. पाटणसावंगी यांचे नवीन बांधकाम झालेल्या घराचे भिंतीला लागुन एक पुरूष जातीचे नवजात शिशु (बाळ) कोणीतरी अज्ञात व्यक्तीने बाळाचा जन्म झाल्यानंतर त्याचा परीत्याग करण्याचे उद्देशाने बाळाला विना कपडयाचे उघडयावर जमीनीवर टाकुन सोडुन निघुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३१७ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, पोस्टे सावनेर मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**